प्रेसनोट दिनांक १७/०४/२०२५

डायघर पोलीस स्टेशन येथील १) गणेश रतन सिंग राठोड , पोहवा/ब.न. ४०६ (वर्ग –३) पोलीस आयुक्तालय ठाणे शहर जि.ठाणे २) खाजगी इसम आकाश जैसलाल गुप्ता यांचेविरुध्द लाचलुचपत विभागाकडून सापळा कारवाई झाले बाबत.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :– | डायघर पोलीस स्टेशन, ठाणे शहर दैनंदिनी क्रमांक ०५४/२०२५, वेळ २२:१७ दिनांक १६/०४/२०२५, |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | १) लोकसेवक गणेश रतनसिंग राठोड, पद –पोलीस हवालदार (वर्ग –३), डायघर पोलीस ठाणे पोलीस आयुक्तालय ठाणे शहर<br>२) खाजगी इसम आकाश जैसलाल गुप्ता रा. देसाईगाव डोंबीवली पुर्व |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | ५,०००/– रूपये (तडजोडअंती) |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी त्यांची मैत्रीण हिने आय.डी.एफ.सी फायनान्स मधून एनफिल्ड कंपनीची टु व्हीलर बाईक खरेदी केली होती. तक्रारदार यांना पैशाची गरज असलेने सदरची बाईक त्यांनी त्यांचे मैत्रीणच्या संमतीने ओएलएक्स ॲपद्वारे मुंब्रातील एका डीलर यास विकली होती. परंतु तक्रारदार यास डीलर यांना गाडीचे नाहरकत प्रमाणपत्र न दिल्याने पैसे परत करण्याबाबत सांगुन तशी तक्रारदार यांना धमकी दिली. सदर तक्रारदार हे दमदाटी केल्यामुळे घाबरून त्यांनी ११२ नंबर डायल करून पोलीस मदत मागीतली. असता डायघर पोलीस ठाणचे दोन पोलीस कर्मचारी तक्रारदार यांना घेवन पोलीस ठाणेत आले. व डिलरचे पैसे परत करण्याबाबत पोलीस स्टेशन कडुन २० दिवसाची मुदत दिली होती. सदरचे प्रकरण मिटवण्या करीता दिनांक १५/०४/२०२५ रोजी डायघर पोलीस ठाणेचे पोहवा/गणेश रतनसिंग राठोड यांनी २०,०००/– रूपये लाचेची मागणी केले वरून दि. १६/०४/२०२५ रोजी तक्रार देण्यात आली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष फोनकॉल करून पडताळणी केली असता यातील तक्रारदार यांचेकडे लोकसेवक पोलीस हवालदार गणेश रतनसिंग राठोड यांनी पंचासमक्ष १०,०००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने त्याअनुषंगाने दि. १६/०४/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांना वीस हजार रक्कम मागितल्याचे मान्य करुन तक्रारदार यांना तु दहा बोलला होतास आता आठ हजार तरी कर आठ हजार इन पटकन जावून घेवून ये पटकन मोकळा हो परंतु तक्रारदार यांनी रु ५,०००/– देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री.गणेश राठोड यांनी तक्रारदार यांच्या फोनवर संपर्क साधल्यानतर तक्रारदार यांनी पाच हजार रकमेबाबत बोलणी केली.त्यावेळी लोकसेवक श्री.गणेश राठोड यांनी रक्कम घेऊन येण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक पोलीस हवालदार गणेश राठोड डायघर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांना शिळफाटा–महापे रोडवरील रूद्र पॉन शॉप येथील खाजगी इसम आकाश गुप्ता यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास सांगितलेवरून त्यांना ५,०००/–रूपये लाच स्विकारतान दिनांक १६/०४/२०२५ रोजी २०:१६ वा. रंगेहात पकडण्यात आले असून लोकसेवक श्री. गणेश रतनसिंग राठोड, पद – पोलीस हवालदार (वर्ग –३), डायघर पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय ठाणे शहर जि.ठाणे व २) खाजगी इसम श्री आकाश गुप्ता रा. डोम्बीवली पुर्व यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी –** **१. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

–संपर्क पत्ता –

लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम – ४००६०१

संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in

Email – spacbthane@ mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन – acbmaharastra.net

टोल फ्रि नंबर– १०६४

दुरध्वनी कमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटसॲप्प् कमांक – ९९२०९१२७५७

( विशाल जाधव )

पोलीस उप अधीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे.